# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट ३८३-२०२४ दिनांक :- १४/१०/२०२४

## " महिलेचे अपहरण करून खंडणी उकळणाऱ्या आरोपीला २४ तासात अटक करण्यात मिरारोड पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश."

दि. ०८.१०.२०२४ रोजी तक्रारदार नामे श्री. **किशोर भवरलाल सुतार** वय ३० वर्ष व्यवसाय सुतारकाम रा. शांतीप्लाजा बिल्डींग नंबर ३५, रु. नं.५०४, शांतीपार्क मिरारोड पुर्व यातील तक्रारदार यांची पत्नी वय १९ वर्षे हया गरबा बघण्यासाठी शांतीपार्क परिसरामध्ये गेल्या होत्या त्या घरी परत न आल्याने त्या हरविल्याबाबत मिरारोड पोलीस ठाणेस मिसिंग क्र. ४४/२४ नोंद करण्यात आली होती. सदर मिसिंगचा तपास करीत असताना यातील अनोळखी आरोपीत याने इन्स्टाग्राम मार्फत प्रथम रु. ५००००/- ची खंडणी मागितली व न दिल्यास त्यांचे पत्नीस (अपहरीत महिलेच्या) जीवास धोका असल्याची धमकी दिली होती. तसेच पैसे दिल्यास पत्नीस सोडून देईन असे सांगितले होते. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी आरोपीताचे बँक खात्यामध्ये पैसे भरले. परंतु पुन्हा आरोपीताने फिर्यादी यांचेकडे पैशाची मागणी केल्याने फिर्यादी यांना पत्नीचे जिवीताची भिती वाटल्याने ते पोलीस ठाणेस आले असता त्यांचे फिर्यादीचे पत्नीचे खंडणीसाठी अपहरण केल्याने तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणेस गु.र.क्र. ३०९/२४, भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १४० (२) ३०८(५) प्रमाणे अज्ञात आरोपी विरुध्द दिनांक ०९/१०/२०२४ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठ अधिकारी यांनी नमुद गुन्हयातील आरोपीताचा तात्काळ शोध घेवून अटक करुन गुन्हा उघडकीस आणण्याच्या व अपहरित महिलेची तात्काळ सुटका करण्याच्या सुचना दिल्या. मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे आरोपीत याचे बँक खात्याचा तपशील प्राप्त केला व सदर तपशीलाचे आधारे तांत्रिक विश्लेषण व सि.सी.टी.व्ही. फुटेजच्या मदतीने आरोपीत हा निष्पन्न केला. सदर आरोपीत हा भरुच, गुजरात येथे असल्याची खात्री माहिती प्राप्त झाल्याने रेल्वे पोलीस ठाणे भरुच गुजरात यांचे मदतीने आरोपीत नामे दिनेशकुमार केशरराम सुतार व अपहरित महिला वय १९ वर्षे यांना ताब्यात घेण्यात आले होते. सदर आरोपीतास दिनेशकुमार केशरराम सुतार, वय १९ वर्षे, व्यवसाय - फोटोग्राफी, रा. १६ ध, सुथारो की दाणी, पनावासपूरा, जाज्वा, ता. गिडा, जि. बाडमेर, राज्य राजस्थान ३४४०३७ यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली असून २४ तासांचे आत अपहरित महिलेची सुटका

याबाबत तपास करीत आहोत. तसेच आरोपीताचा पुर्व इतिहास तपासुन पाहत आहोत. याबाबतचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली नमुद गुन्ह्याचे तपासी अधिकारी सपोनि प्रविण भोसले हे करत आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१, मिरारोड, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरा रोड विभाग, चंद्रकांत सरोदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मिरारोड पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस स्टेशनचे सपोनि संतोष सांगवीकर, सपोनि प्रविण भोसले, सपोनि विजयेंद्र आंबवडे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.ह. ०६१०४/झावडे, पो.ह. ०६२६७/गिरमे, पो.ह. ०७१३६/पाटील, पो.ह. ०७१५१/तेरवे, पो.ह. १००३९/हरणे, पो.शि. १५०१२/शेळके, पो.शि. २२०५३/देवरे, पो.शि. २२०६३/दासरे व तांत्रिक मदत पो.ह. ०००२०/जाधव अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.

-----ooo-----